नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०७/२०२५ (बुधवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस भवन येथे घेण्यात आली पोलीस पाटलांची बैठक

दिनांक ३०/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस भवन येथे उपविभाग सावनेर ,काटोल आणि कन्हान हद्दीतील पोलीस पाटील यांची बैठक आयोजीत करण्यात आले होते. सदर बैठकीत श्री अनिल म्हस्के , अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी नमुद उपविभागातील पोलीस पाटलांची बैठक घेवुन त्यांना आगामी येणाऱ्या जन्माष्टमी, गोपाळकाला, पोळा, गणेश,चतुर्थी(स्थापणा), अनंत चर्तुदशी (विर्सजन) या सणोत्सवाच्या कालावधीमध्ये आणि आगामी निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन गावात शांतता राखावी. तसेच गावात सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्याबाबत, महीला व बालकांच्या सुरक्षेबाबत, गावतील अवैध धंदयावर आळा घालणेबाबत इत्यादी मुद्दयांवर मार्गदर्शन करून सुचना देण्यात आल्या. सदर बैठकीत श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग आणि श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांनी सुध्दा उपस्थित पोलीस पाटलांना मार्गदर्शन करून सुचना दिल्या. सदर बैठकीस ४५० ते ५०० पोलीस पाटील हजर होते.







## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू, बाळगणाऱ्या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ६ गुन्हे नोंद एकुण १३,१३०/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २९/०७/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री/वाहतुक करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल गावठी दारू असा एकुण १३,१३०/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी देविदास परसराम साठवने वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र.०२ कुही ता.कुही जि.नागपुर आणि अभिषेक मारोती मोहड वय ३० वर्ष, रा पाटणसांवगी ता सावनेर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापरखेडा** येथे १.नागीनाप्रसाद संतलाल गौतम वय ५० वर्ष, रा.वार्ड क्र ०६ वलनी कालनी खापरखेडा, २.अजित अनिल सिंग वय ३५ वर्ष रा.वलनी कालनी खापरखेडा यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे अमन संदीप प्रल्हाद बिसन, रा. भगतसिंह वार्ड, रामटेक यांचेवर गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे संदिप सोनबाजी गिरडे, वय ३६ वर्ष, रा. चनोडा, ता.उमरेड,

जि. नागपूर यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी** येथे आरोपी नामे कपील दुधराम कांबळे,वय ३८ वर्ष, रा. एरंडी, ता.अजुनी जि.गोदिया अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ६ गुन्हे दाखल केले आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयात जागतीक मानवी तस्करी दिनानिमित्य करण्यात आले विशेष कार्यशाळेचे आयोजन

दिनांक ३०/०७/२०२५ रोजी जागतीक मानवी तस्करी दिनानिमित्य नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस भवन येथे जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला कार्यरत पोलीस काका आणि पोलीस दिदी चे काम करणारे पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्या साठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेला अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंध विभाग, भरोसा सेल चे अधिकारी आणि अंमलदार सुध्दा हजर होते. मानवी तस्करीसारख्या व्यापक गुन्ह्याला आळा घालणे, मानवी तस्करी या गंभीर मुद्‌दयांवर जनसामान्यामध्ये जावुन जनजागृती करणे यासाठी पोलीस स्टेशन स्तारावर काम करणारे अधिकारी आणि अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षण हे नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस , जिल्हा महीला व बाल विकास अधिकारी ,नागपुर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपुर, बालकल्याण समिती ,नागपुर आणि मुक्ती ट्रस्ट नागपुर यांनी संयुक्तीक रित्या घेतले. सदर कार्यक्रमात १) श्रीमती सुरेखा बोरकुटे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपुर , २) श्री वसीम शेख, होप फाउंडेशन फॉर चिड्रेन, पुणे, ३) श्रीमती छाया राउत, अध्यक्षा, बालकल्याण समिती ,नागपुर ,४) श्री मुस्ताक पठाण, जिल्हा महीला व बाल विकास अधिकारी, ५) सहा. पोलीस निरीक्षक, श्रीमती माधुरी गायकवाड, प्रभारी अधिकारी, भरोसा सेल, नागपुर ग्रामीण यांनी प्रशिक्षणाकामी हजर पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना मार्गदर्शन केले.




JUST RIGHTS
CHILD TRAFFICKING IS AN ORGANIZED CRIME
END THE EXPLOITATION
WORLD DAY AGAINST TRAFFICKING IN PERSONS
30 JULY 2025
सुस्वागतम
जिल्हा
विधी सेवा प्राधिकरण,
नागपूर

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने